# डॉ. बाबासाहेब आंबेडकर
## पोवाडा.
(शाहीर प्रभाकर जामखेडकर, मुंबई.)

घडविला ज्यांनी इतिहास। बदलला देश। अग्रणी त्यात।
शिल्पकार नव्या भारताचा। कैवारी दीन दलितांचा।
पोवाडा गाती सारे त्याचा॥ धृ॥
बाबासाहेब आंबेडकर थोर। आठवा आचार। दिव्य सुविचार।
ज्ञानयोगी दुजा बुद्ध झाला। जात, पात, बंध तोडण्याला।
समाजक्रांतीचा रस्ता धरला॥

चाल: दोन हजार वर्षांपूर्वीचा ऐका इतिहास।
चार मजले हिंदू धर्मास ठाव समद्यास।
नवल म्हंजे जिने नाही, एकमेका जोडण्यास।
जो जिथे जन्माला आला। जन्मला तिथे कोंडला।
कोंडता, कवाड कायम बंद त्याजला॥

चाल: कुत्री मांजर पवित्र त्यांना। दलितांची कीव कुणा येईना॥
सावलीचा विटाळही त्यांना। न्याय द्यावा कसा कुणी त्यांना॥

चाल: दलितांचा करण्या उद्धार। जन्मला थोर। 'भीम' महाशूर।
१८९१ सालात। वैराग्याची वाणी खरी ठरणार।
दलित बंधूंचे पांग फेडणार॥

चाल: बालपणी केला निर्धार। जन्मभर सतत लढणार॥
ज्ञानशक्ती खरा आधार। खूप शिकून पदव्या घेणार॥

चाल: १३ साली परदेशी गेला। सारी शक्ती लावली शिकण्याला।
पैसे कुठे पुरत जेवण्याला। कॉफी, केक, मासळी खाऊन भागवी भूकेला॥
१५ साली एम्.ए. जाहला। गहन अभ्यास जातीवर केला।
प्रहार करून मनूला दाह दिला त्यावेळा॥ खालच्यांना आणि दलितांना।
विद्या, शास्त्र, वस्त्र, धन मिळू नाही दिले त्यांना॥
जातीसंस्था यामुळेच टिकली आपल्या देशाला॥

चाल इंग्रजी भाषा वाघीण। नव विचारांची ती खाण॥

क्रांतीची देतसे जाण । ज्ञानाची नाही मग वाण ॥

चाल: वाघाचा बच्चा हा वाघ । पचविल वाघिणीचा दूध ।
वाघांच्या डरकाळ्यांनी देश गेला हादरून ॥
विद्येची आत्मसात केली किती दालन ॥

चाल : तळ किंवा विहिर जिथे पाणी भरपूर । सारे पिती पुरेपूर । पर यांची दुरदूर ।
दलितांना मज्जाव फार । बर बर । पाणी नाही त्यांना चूळभर ॥
दणकेबाज सत्याग्रह केला जोरदार । भिक्षुकशाही गारेगार । बभ्रा त्रिखंडात फार ।
महाडच तळं चवदार । चवदार । दलितांना खुलं केलं दार ॥

चाल : वाचनाचं वेड भरपूर । ग्रंथ विकत घेण्यावर भर । वाचनालय झालं हे घर ।
वाचल्यावर खूण करणार । राजगृहात ग्रंथ पसरले सर्व घरभर ॥
अष्टपैलू बुद्धिची जोड । विद्वत्तेस ज्याच्या नाही तोड । युक्तिवाद ज्याचे बिनजोड ।
असा दावा दूजा कुणी ! सवाल माझा बिनतोड ॥

चाल : बुद्ध, फुले आणि कबीर । दैवते बाबांची थोर ॥
तीन शब्दात सांगती सार । सर्व माणस समान भूवर ॥

चाल : स्वातंत्र्य, बंधुभाव, समतेवरती भर ॥
परी शांती नाही चित्ताला । भेदभाव छळवादाला । थारा नको असल्या गोष्टीला ।
असा धर्म हवा आज मला ! ५६ साली निर्णय केला । ऑक्टोबरच्या १४ तारखेला ।
कवटाळी बुद्ध धर्माला । दीक्षा बुद्ध धर्माची घेता शांती चित्ताला ॥

चाल : माझा बोल खरा मी केला । द्याव ध्यानाला । विनंती तुम्हाला ।
जबाबदारी तुमच्या शिरावर । बौद्ध धर्माचा करा आदर ।
नाहीतर छी: थू होईल सर्व जगभर ॥ संपूर्ण ॥

Sincerely
N. Nim Ca
Nyal: